# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 &
Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Naresh M. Madavi
Programme Coordinator (I/c.)
Ph. No. - 07132-223320

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 133 /2017 Dt: 18/07/2017

प्रति,

मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय:– स्वयंनिर्वाह नविन रासेयो एकक (Self Finance Unit) सुरु करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत.**

संदर्भ :– महाराष्ट्र शासन निर्णय क्र. रासेयो–२०१७/प्र.क्र./८७/१७/साशि–७, मुंबई, दि. २०, जून, २०१७.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, सामाजिक सेवेतून विद्यार्थ्यांचा परिपूर्ण विकास करणारी एकमेव योजना म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना. रासेयोमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर दोन वर्षात त्यांचा सर्वांगीण विकास होवून विद्यार्थी सर्वगुणसंपन्न होण्यास मदत होते. या योजनेत सहभागी विद्यार्थ्याला विद्यापीठाच्या नियमानुसार १० प्रोत्साहनपर गुण दिल्या जातात. सदर विद्यार्थी भविष्यकाळात यशस्वी नागरीक म्हणून गौरविले जातात. रासेयोची अनुदानीत स्वयंसेवक संख्या व रासेयोमध्ये प्रवेश घेण्यासाठी ईच्छुक विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेवून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता यावा या दृष्टीने केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने **स्वयंनिर्वाह रासेयो एकक (Self Finance Unit)** अनुदानित रासेयो एककाच्या धर्तीवर सुरु केले आहे. महाराष्ट्र शासनाने आपल्या विद्यापीठाच्या रासेयो कक्षाला स्वयंनिर्वाहीत रासेयो एककाला सत्र २०१७–१८ पासून १२०० संख्या वाढवून एकुण २००० स्वयंसेवक संख्या आवंटीत केलेली आहे.

करीता आपल्या महाविद्यालयात सत्र २०१७–१८ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंनिर्वाहित रासेयो एकक स्थापन करावयाचे असल्यास **दि. १० ऑगष्ट, २०१७** पर्यंत आपल्या महाविद्यालयामार्फत **स्वयंनिर्वाहित** रासेयो एककाकरीता रासेयो समन्वयक गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालयास प्रस्ताव खालील कागदपत्रांसह सादर करावा जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल.

१. महाविद्यालयाच्या लेटरहेडवर स्वयंनिर्वाहित रासेयो एकक मागणी पत्र.
२. रु. १००/– च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र (सोबत नमूना जोडला आहे).
३. रासेयो एकक मागणी प्रस्ताव (सोबत नमूना जोडला आहे).
४. महाविद्यालय शासन व विद्यापीठ मान्यता पत्र (छायांकीत प्रत).
५. मा. प्राचार्य यांचे नेमणूक पत्र (छायांकीत प्रत).
६. रासेयो कार्यक्रम अधिकारी नियुक्ती पत्र.

स्वयंनिर्वाह रासेयो एकक स्थापन करण्याकरीता ईच्छुक महाविद्यालयांनी वरील कागदपत्रे प्रस्तावासह **दि. १० ऑगष्ट, २०१७** पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

कळावे.
धन्यवाद!

**कार्यक्रम समन्वयक (कार्य.)**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

**सुचना: (कार्यक्रम अधिकारी नेमणुक करताना सदर प्राध्यापकास विद्यापीठ मान्यता असणे आवश्यक आहे.)**

स्वयंनिर्वाह रासेयो एककासाठी महाविद्यालयाची माहिती व प्रस्ताव

1. महाविद्यालयाचे नाव :

2. प्राचार्यांचे नाव : ..................................................

मोबाइल क्र : ..................................................

इमेल : ..................................................

3. नेमणूक कायमस्वरुपी / प्रभारी : ..................................................

4. महाविद्यालयाचा विद्यापीठ संलग्नीकरण क्र. : ..................................................

5. महाविद्यालयास शासन मान्यता आहे काय ? : ..................................................

असल्यास 1) मान्यता क्र. ..................................................

अनुदानित किंवा विनाअनुदानित : ..................................................

6. प्रशिक्षित / अप्रशिक्षित कार्यक्रम अधिकारी नावे व अनुभव

अ) विद्यार्थी संख्या 50-100 एक कार्यक्रम अधिकारी

ब) विद्यार्थी संख्या 150-200 दोन कार्यक्रम अधिकारी

| अक्र | कार्यक्रम अधिकारी नाव व विषय | जन्म दिनांक | शिकविण्याचा अनुभव | विद्यापीठ मान्यता आहे/नाही | प्रशिक्षित/ अप्रशिक्षित | कार्यक्रम अधिकारी अनूभव | मोबाइल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |

7. मागील तीन वर्षाची महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या

| वर्ष | महाविद्यालयातील एकुण विद्यार्थी संख्या | | | रासेयो स्वयंसेवक संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकुण | मुले | मुली | एकुण |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

8. सन 20.... - 20.... साठी स्वयंनिर्वाह रासेयो एककाकरिता अपेक्षित स्वयंसेवक संख्या : ....................

कार्यक्रम अधिकारी, रासेयो

प्राचार्य

## हमीपत्र(स्वयंनिर्वाहित रासेयो एककाकरिता)

विषय :- स्वयंनिर्वाहित राष्ट्रीय सेवा योजना एककाबाबत ..

आमचे, ............................................................................ महाविद्यालय हे गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली मान्यता पत्र ........................................ दि................ नुसार संलग्नित आहे. महाविद्यालय शैक्षणिक वर्ष .............................. पासून सुरु असून आमच्याकडे ..........................................................

हे वर्ग चालु असुन एकूण ........................ विद्यार्थी व विद्यार्थीनी संख्या आहे.

१. आपण ठरविलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार आमच्याकडे मान्यताप्राप्त प्राचार्य आहेत.

२. राष्ट्रीय सेवा योजनेसाठी कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्त प्राध्यापकास विद्यापीठाची मान्यता आहे.

३. तरी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंनिर्वाहित एकक सुरु करण्याची आमची इच्छा असुन रासेयो मधील विविध उपक्रम/कार्यक्रम आयोजीत करुन विद्यार्थ्यांच्या विकासाकरिता चांगले काम करणार आहोत. याची सर्व जबाबदारी संस्थाचालक म्हणून आमची राहील याची आम्हाला पूर्ण कल्पना आहे.

या हमीपत्राद्वारे आम्ही आपणास अशी हमी देतो की, विद्यापीठाच्या किंवा राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रतिमेस बाधा येणार नाही, आपल्या मार्गदर्शन तत्वानुसार नियमित कार्यक्रम तसेच विशेष शिबिर अतिशय चांगल्या पद्धतीने पार पाडू व याकरिता रासेयो विभागामार्फत अनुदान न मिळाल्यास महाविद्यालय स्वतः अनुदानित रासेयो एककाप्रमाणे खर्च करुन लेखे व वार्षिक अहवाल आपण दिलेल्या वेळेमध्ये सादर करण्यात येतील अशी आम्ही हमी देतो.

प्राचार्य
सही व शिक्का

संस्थापक अध्यक्ष/सचिव
सही व शिक्का